माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्र.८२/२०१९**

तक्रारकर्ता श्री.रमेश वामनराव हाटे.
रा.मु.पो.भिम नगर काकडदाती, ता.पुसद, जि.यवतमाळ.
विरुध्द

**जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार,**
**वसंत नगर पोलीस स्टेशन, ता.पुसद, जि.यवतमाळ**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ**

**तक्रार सुनावणी दिनांक - २५.०७.२०२४.**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

तक्रारकर्ता यांनी दि.२७.१२.२०१९ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.०६.११.२०१९ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे कारण नमुद केले आहे.

प्रस्तुत तक्रारीवर आज दि.२५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.पंकज अतुलकर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.११.२०१९ रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, दि.१२.०९.२०१९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने तक्रारकर्त्याने आयोगाकडे थेट तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे, तक्रारकर्ता यांचा युक्तीवाद व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या खुलाश्यावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारदार श्री.रमेश हाटे यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-अ नूसार त्यांनी केलेल्या तक्रार अर्जावर पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन वसंतनगर यांनी केलेली कार्यवाही तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दैनिक प्रगती अहवाल याबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती मागितली असल्याचे आढळून येते. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या आधिच खुलासा दिला असून, दि.०४.१२.२०१९ रोजी दिलेल्या नोंदणीकृत टपालाचा तपशील देखील सादर केलेला आहे. त्याविरुध्द तक्रारकर्ता यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला. व त्यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी श्री.अनुराग जैन यांनी दि.१९.१२.२०१९ रोजी आदेश देखील पारित केला असून, विशेष न्यायदंडाधिकारी न्यायालय पूसद यांनी कलम १५६(३) अन्वये आरोपीविरुध्द कलम ३०२, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत ठाणेदार पोलीस स्टेशन, वसंतनगर पुसद यांना आदेशीत केले असून, त्याप्रमाणे अपराध क्र.८१/२०१८ कलम ३०२,३४ भा.दं.वि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून, सदरचा गुन्हा हा अपिलीय आदेश पारित झाला तेव्हा तपासात होता. तपासाअंती गुन्ह्यांच्या तपासाबाबत न्याय दंडाधिकारी, न्यायालय पुसद यांना योग्य अहवाल देण्याची तजवीज ठेवण्यात आली असल्याचेही नमूद केलेले आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी त्यांना कुठलीच माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदविला होता ते लक्षात घेवून उपरोक्त माहिती पुनश्च एकदा प्रदान करण्याचे निर्देश देखील वरील अपील सुनावणी दरम्यान देण्यात आले होते. ही बाब लक्षात घेता, तक्रारकर्ता यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने शासकीय कर्तव्य पार पाडतांना कुठलीही दिरंगाई झाली नाही तसेच माहिती सादर करतांना कालमर्यादेचे पालन देखील करण्यात आलेले आहे, असे नमूद केले असून, सदर गुन्ह्यांच्या तपासात वैद्यकीय अधिकारी यांनी मृतक यांच्या पी.एम. रिपोर्ट कॉलम क्र.२०(d) व (e) मध्ये " Congested and oozing of fluid is seen on squizing of lungs" तसेच पी.एम.रिपोर्ट मध्ये मरणाचे कारण पाण्यात बुडून मृत्यु असे दिले असून, पी.एम.रिपोर्ट च्या क्वेरीमध्ये मृतकाच्या पोटामध्ये पाणी देखील आढळून आले असल्याचे व मृतकाच्या अंगावर असलेल्या जखमा ह्या जलचर प्राण्यांमुळे होवू शकतात असे अभिप्राय दिले असून, सदर गुन्ह्यांतील संशयीत आरोपी याचे जाबजबाब नोंदणी कलम १६४ सी.आर.पी.सी प्रमाणे मा.न्यायालयात सदर गुन्ह्यांचा तपास पूर्ण करुन "क" फायनल क्र.१८/२०२० दि.३०.०३.२०२० रोजी तयार करुन सादर करण्यात आले. याबाबतीत तक्रारकर्ता यांनी केलेला आरोप हे वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचेही यात नमूद केलेले आहे. याउलट तक्रारकर्ता श्री.हाटे यांचे म्हणण्यानूसार प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीत त्यांना बाहेर काढण्यात आले व अपमानास्पद वागणूक देण्यात आली असून, त्यांचे मुलाच्या संशयास्पद मृत्युमध्ये संबंधीत पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची भूमीका ही संदेहास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच याबाबतीत अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कार्यवाही करण्याची मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी तक्रारकर्ता यांनी कलम १८ (१) नूसार दि.२७.१२.२०१९ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता, या प्रकरणी तक्रारकर्ता यांच्या जोडपत्र – अ च्या अनुषंगाने या आधिच देण्यात आलेला प्रतिसाद तसेच अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला सविस्तर आदेश, प्राधिकरणाचे वतीने तक्रार अर्जाची सुनावणी सूचना प्राप्त झाल्यानंतर सादर केलेला



राज्य माहिती आयोग खंडपीठ कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

सविस्तर खुलासा, त्यात संलग्न केलेली कागदपत्रे याचे अवलोनक केले असता, उपरोक्त प्रकरण माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनूसार दिलेला प्रतिसाद व पारित केलेला आदेश कायद्याशी सुसंगत आढळून येतो. मात्र तक्रारकर्ता यांना मा.विशेष न्यायदंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानंतर करण्यात आलेला तपास व सादर करण्यात आलेली "क" फायनल (सी समरी अहवाल) यातील निष्कर्षा विषयी शंका असल्यास अथवा ते त्याच्याशी सहमत नसल्यास कायद्याद्वारे प्रदान अशी सर्व पाऊले उचलण्याचे त्यांचे स्वातंत्र अबाधित आहे. प्रस्तुत प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीची मर्यादा लक्षात घेता, यात एखाद्या गोष्टीचा तपास कुठल्या प्रकारे करण्यात यावा व तपासणी अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष योग्य किंवा कसे याबाबतीत कुठलेही मतप्रदर्शन करणे हे संयुक्तीक होणार नाही. मात्र तक्रारकर्ता यांना प्राधिकरणाचे वतीने माहिती अधिकार अंतर्गत दिलेला प्रतिसाद हा प्रथम दर्शनी योग्य असल्याचे आढळून येते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, उपरोक्त तक्रारअर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय
सत्यमेव जयते
अमरावती विभाग, अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०७.२०२४**

जावक क्रमांक ०२८०५ दिनांक 30 OCT 2024

जेगमित केले
30 OCT 2024



राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती